डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार व डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार सन २०२४-२५ वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.मराग्रं-२०२६/प्र.क्र.९५/ई-१६६८९७६/ग्रं.क.
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२६

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.मराग्रं-२०२२/प्र.क्र.६०/ग्रं.क., दि.१६.११.२०२३
२) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.३१/ पुरस्कार २४-२५/२०२६-२७/३४९८, दि.३०.०९.२०२६.

प्रस्तावना :

महाराष्ट्रातील जनतेचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यासाठी व वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान लाभावे, यासाठी ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, या ग्रंथालयांकडून राज्यातील जनतेला अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शासनाकडून दरवर्षी उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देवून त्यांना सन्मानित करण्यात येते. उक्त वाचा क्र. १ येथील शासन निर्णयाव्दारे सदर पुरस्काराबाबतच्या तरतुदी व निकष निश्चित करण्यात आले आहेत.

सन २०२४-२५ या वर्षासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्काराकरिता पुरस्कार्थींची निवड करण्यासाठी दि.३१.०७.२०२६ रोजी राज्य निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये निवड झाल्यानुसार पुरस्कार जाहीर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०२४-२५ या वर्षासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.:-

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार

(१) शहरी विभाग :

अ.क्र.	ग्रंथालयाचे नाव व पत्ता	ग्रंथालयाचा दर्जा/ वर्ग	पुरस्काराची रक्कम रुपये
१	पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर	अ	१,००,०००/-
२	स्व. संजय-सविता स्मृती सार्वजनिक वाचनालय, कृष्णनगर, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर	ब	७५,०००/-
३.	स्व. मंगलताई सतर्के सार्वजनिक वाचनालय, लक्ष्मीनगर, उमरसरा, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ	क	५०,०००/-

(२) ग्रामीण विभाग:

अ.क्र.	ग्रंथालयाचे नाव व पत्ता	ग्रंथालयाचा दर्जा/ वर्ग	पुरस्काराची रक्कम रुपये
१	कै.किसनराव जाधव सार्वजनिक वाचनालय, रायमोह, ता.शिरूर कासार, जि.बीड	ब	७५,०००/-
२	श्री रामदास मोफत वाचनालय, ग्रामपंचायत, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा	क	५०,०००/-
३	प्रमोद महाजन सार्वजनिक वाचनालय, खुडाणे, ता. साक्री, जि.धुळे	ड	२५,०००/-

(ब) डॉ. एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार

१. राज्यस्तरीय पुरस्कार:

पुरस्कार	कार्यकर्त्याचे / सेवकाचे नाव व पत्ता	पुरस्काराची रक्कम रुपये
राज्यस्तरीय ग्रंथालय कार्यकर्ता (ग्रंथमित्र)	**डॉ. राजेंद्र मुरलीधर सानप,** सचिव, स्व. जानकीदेवी सानप सार्वजनिक वाचनालय, सावरगांव (घाट) ता. पाटोदा, जि.बिड	५०,०००/-
राज्यस्तरीय ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र)	**श्री. संजय शिवाजीराव इंगवले,** ग्रंथपाल, श्री. नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय, ता. पाटण, जि. सातारा	५०,०००/-

(२) डॉ. एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता (ग्रंथमित्र) विभागस्तरीय पुरस्कार :

अ.क्र.	विभाग	पुरस्कार प्राप्त कार्यकर्त्यांचे नाव व पत्ता	पुरस्काराची रक्कम रुपये
१	अमरावती	**श्री. सुनिल एकनाथराव वायाळ** जागृती सार्वजनिक वाचनालय, सरस्वती नगर, चिखली, मु.पो.ता. चिखली, जि. बुलढाणा	२५,०००/-
२	छत्रपती संभाजीनगर	**श्री. गजानन पंडितराव शिंदे,** कै. रंभाबाई रामचंद्र बियाणी नुतन साहित्य मंदिर वाचनालय, बियाणी नगर, ता. जि. हिंगोली	२५,०००/
३	नागपूर	**श्री. मिलींद धोंडबाजी जुनगडे,** विदर्भ ग्रामीण विकास सार्वजनिक वाचनालय, भिमनगर, सावंगी मेघे, जि. वर्धा	२५,०००/
४	नाशिक	**प्रा. डॉ. नरेंद्र बाबुगीर गोसावी,** कै. इंदुबाई बाबुगीरी गोसावी सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, ता. जि. नंदुरबार	२५,०००/
५	पुणे	**श्री. कैलास लक्ष्मण चौरे,** श्रीनाथ म्हस्कोबा सार्वजनिक वाचनालय, मु. पो. गोपाळवाडी (दत्तनगर) ता. दौंड, जि. पुणे	२५,०००/
६	मुंबई	**श्री. चांगदेव भीमराज काळे,** ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय, जि. ठाणे	२५,०००/-

(३) डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) विभागस्तरीय पुरस्कार :

अ. क्र.	विभाग	पुरस्कार प्राप्त सेवकांचे नाव व पत्ता	पुरस्काराची रक्कम रुपये
१	अमरावती	**श्री. संजय वामनराव देशमुख,** ग्रंथपाल, जय सेवा वाचनालय, "युगंधर" विजय कॉलनी, पो. रुक्मिणी नगर, अमरावती, ता. जि. अमरावती	२५,०००/-
२	छत्रपती संभाजीनगर	**श्रीमती गोकर्णा संजय सुर्यवंशी,** ग्रंथपाल, श्री छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक वाचनालय, शिवपूर, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर	२५,०००/-
३	नागपूर	**श्री. सुनिल सदाशिव बोरकर,** ग्रंथपाल, राष्ट्रीय वाचनालय, महाल, ता. नागपूर, जि. नागपूर	२५,०००/-
४	नाशिक	**श्री. रावसाहेब यादवराव वाळके,** ग्रंथपाल, किसान सार्वजनिक वाचनालय, काजीसांगवी, ता. चांदवड, जि. नाशिक.	२५,०००/-
५	मुंबई	**श्रीमती मीनल मनोज हळदणकर,** ग्रंथपाल, रत्नागिरी जिल्हा नगर वाचनालय, ता.जि. रत्नागिरी	२५,०००/-

२. उपरोक्त पुरस्कार्थींना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेली रोख रक्कम, सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात येईल.

३. उपरोक्त पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्याबाबतची पुढील कार्यवाही ग्रंथालय संचालक यांनी त्वरीत करावी.

४. सदर खर्च मागणी क्र.डब्ल्यू-४, २२०५, कला व संस्कृती, १०५, सार्वजनिक ग्रंथालये, (०१) ग्रंथालय संचालनालय, (०१) (०१) ग्रंथालय संचालनालय, लेखाशीर्ष २२०५ ०२५१, उद्दीष्टशीर्ष ०५ बक्षीसे या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ वर्षामधील उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६१११७१२०६०१५८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
Date: 2026.11.17 12:07:03 +05'30'

(डॉ. श्रीकांत पुलकुंडवार)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई (व्यापक प्रसिद्धीसाठी)
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई
११. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक / जिल्हा ग्रंथालय अधिकारी/ जिल्हा ग्रंथपाल.(ग्रंथालय संचालनालयामार्फत)
१३. अवर सचिव (अर्थसंकल्प कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती (ग्रं.क.), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.